# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र. ७३०/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक ०७/११/२०१६

**१) घरातील दाराचा ताला तोडुन सोण्या चांदीच्या दागीण्याच्या व नगदी चोरी . :–**

दिनांक ०५/११/२०१६ चे रात्री. ०९.०० वा. ते दि.०६/११/२०१६ चे ०५.०० वा. दर. यातील फिर्यादी श्री परमानंद तुकाराम मेश्राम वय २८ वर्ष, रा. चिचखेडा (पुर्नवसन) हे परीवारासह घराला कुलुप लावुन गावामध्ये सरू असलेली नाटक पाहण्याकरीता गेले असता फिर्यादीच्या राहते घराचे समोरील दाराचा कुलुप तोडुन घरामध्ये आत प्रवेश करुन बेडरूम मधील लोखंडी कपाटातील लॉकर मधुन कोणीतरी अज्ञात चोराने ८ ग्रॅम सोण्याची कारल्या मण्याची एक गाठी कि. १६,०००/रू व एक बारीक मण्याची सोण्याची गाठी ज्यामध्ये ३९ मणी वजन ७ ग्रॅम कि. १,४००/रू व रोख रक्कम १६,८००/रू असा एकुण ४६,८००/रू चा माल चोरुन नेल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन पवनी येथे कलम ४५७,३८० भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. गदादे पो.स्टे. पवनी हे करीत आहेत.

**२) मोटार सायकलची चोरी . :–**

दिनांक ०४/११/२०१६ रोजी १५.०० वा. दर. यातील आरोपी हा फिर्यादीचा साळा असुन घरी पाहुना व फिर्यादी घरी असतांना फिर्यादीला न वीचारता घरात ठेवलेली हिरो एच.एफ टिव्हीएस कंपनीची मोटार सायकल क्र. एम.एच.३६ व्ही.५३४५ कि. ५१,०००/रू ची फिर्यादीला न विचारता घेवुन गेला फिर्यादीने दोन दिवश मोटार सायकल व आरोपीचा शोध घेवुन मिळुन न आल्याने फिर्यादीचे उमेश चंदुजी मलेवारवय ३८ वर्ष रा. इंदीरानगर आसगाव यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन पवनी येथे कलम ३८० भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. चुटे पो. स्टे. पवनी हे करीत आहेत

**३)घरातील दाराचा ताला तोडुन सोण्या चांदीच्या दागीण्याच्या चोरी . :–**

दिनाक २/११/२०१६ रोजी १९.०० ते ०३/११/२०१६ चे ०९.०० वा. दर. यातील फिर्यादी राजु मधुकर बागडे वय ४७ वर्ष, रा. सुभाष वार्ड मोहाडी हे आपल्या कुंटुबासह देवदर्शना करीता बाहेरगावी गेले असता त्या वेळी त्यांचे घराचा आतील दरवाजा खुला राहीला होता त्या दरम्यान कोणीतरी अज्ञात चोराने फिर्यादीचे मागील खुल्या दरवाज्यातुन आत प्रवेश करुन घरातील लोखंडी कपाटा मध्ये ठेवलेले १ सोन्याचा मंगळसुत्र २८ ग्रॅम सोन्याचा लहान मंगळसुत्र ०९ ग्रॅम, सोन्याचे झुमके वेल ०८ ग्रॅम, सोन्याच्या ०४ अंगठया ०४ ग्रॅम, ०२ सोन्याच्या चैन १८ ग्रॅम असा एकुण अंदाजे ६७ ग्रॅम सोन्याचे दागीने किमती ६३,०००/–रु. चा माल चोरुन नेल्याने फिर्यादी यांचे लेखी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन मोहाडी येथे कलम ३८० भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. गेडाम पो. स्टे. मोहाडी हे करीत आहेत.

**४) मोटार सायकलची चोरी . :–**

दिनांक ०५+०६/११/२०१६ रोजी ०७.०० वा. दर. यातील फिर्यादी कमल किशोर देशराज चड्डा वय ४२ वर्ष, रा. पांडे महल वार्ड जेल रोड भंडारा हे आपली पॅशन प्रो मोटार सायकल क्र. एमएच ३६ एन ६३०७ किमती २५,०००/–रु. ची घरासमोर अंगणामध्ये ठेवली असता कोणीतरी अज्ञात चोराने कोणीही नसल्याची संधी साधुन चोरुन नेल्याने फिर्यादी यांचे वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३७९ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. दांदडे पो. स्टे. भंडारा हे करीत आहेत.

**५) अवैध दारु अडयांवर धाडी . :–**

दिनांक ०६/१०/२०१६ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पो.स्टे. करडी, भंडारा व सिहोरा येथील अवैध दारू अडयांवर धाडी घालुन एकुण ०४ गुन्हे दाखल करुन आरोपीतांच्या ताब्यातुन ४४ लिटर हातभट्टी दारु कि. २,६००/–रू. ५ लिटर ९४० मिली लिटर देशी/विदेशी दारु कि. १,९७०/–रु. असा एकुण कि. ४,५७०/–रू. चा माल जप्त करण्यात आला आहे.

पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा करीता
दुरध्वनी.क्र.९४२२८३२१७८

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.